16 MAR 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# तणावमुक्तीसाठी संगीत सर्वोत्तम उपाय

## कुलसचिव डॉ. नांदवडेकर : नाट्यशास्त्र विभागातर्फे संगीत नाटक महोत्सव

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : तणावमुक्तीसाठी संगीत हा सर्वोत्तम उपाय असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे दोनदिवसीय संगीत नाटक महोत्सवात ते बोलत होते. ज्येष्ठ तबलावादक पंडित आनंद बदामीकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या महोत्सवाचे उद्घाटन झाले.

डॉ. नांदवडेकर यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनात तणावमुक्तीसाठी संगीत हा सर्वोत्तम उपाय आहे. त्यामुळे प्रत्येकाने संगीताचा आस्वाद घेत निरामय आयुष्य जगावे, असे सांगितले. यानंतर प्रख्यात चित्रकार बबन माने आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या चित्रशिल्प प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. नांदवडेकर आणि पंडित आनंद बदामीकर यांच्या हस्ते संपन्न केले. महोत्सवांच्या पहिल्या सत्रात पंडित आनंद बदामीकर यांचे सोलो तबलावादन झाले. तसेच त्यांनी उपस्थितांना तबल्याची उत्पत्ती, विविध प्रकारचे ताल, मात्रा आणि तबल्यामधील विविध शैली, घराणी यांबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले. त्यांना अमित साळोखे यांनी संवादिनीवर साथ केली.




कोल्हापूर : चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन करताना पंडित आनंद बदामीकर, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.

दुसऱ्या सत्रात आर. एस. सबनीस यांचा एकल हार्मोनिअमवादनाचा कार्यक्रम संपन्न झाला. विविध नाट्यगीते आणि बंदिशी सादर करून त्यांनी रसिकांची मने जिंकली. त्यांना मधुसूदन शिखरे यांनी तबल्यावर साथ केली. सायंकाळच्या सत्रात डॉ. सौ. भारती वैशंपायन यांच्या शास्त्रीय संगीताची मैफल रंगली. विविध रागांमध्ये गंधार आणि शड्ज यांची गुंफण करून अनेक रचना त्यांनी सादर केल्या. सुमारे तीन तासांहून अधिक काळ चाललेल्या या मैफलींनी कानसेनांना स्वरसमाधीची अनुभूती दिली. त्यांना तबल्यावर केदार वैशंपायन आणि संवादिनीवर संदीप तावरे यांनी साथ दिली. या वेळी विभागप्रमुख प्रा. एन. व्ही. चिटणीस, डॉ. अंजली निगवेकर, डॉ. विनोद ठाकूर-देसाई, श्री. निखिल भगत, माजी विभागप्रमुख डॉ. शुभदा वायंगनकर, सतीश कुसुंबे, शिवाजी झोरे, स्वरूपा मोरबाळे, यशवंत वणिरे, डॉ. आनंद धर्माधिकारी, दीपक दाभाडे यांच्यासह अन्य मान्यवर आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2018
सकाळ

# पदवी प्रमाणपत्रे वाटण्यासाठी ८१ बूथ

## दीक्षान्त सोहळा : मंडप उभारणीचे काम सुरू



सकाळ वृत्तसेवा


कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठात येत्या सोमवारी (ता. १९) होणाऱ्या दीक्षान्त सोहळ्याकरिता परीक्षा भवन एक व लोककला केंद्रासमोर मंडप उभारणी सुरू झाली आहे. पदवी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यासाठी ८१ बूथ उभारले जात असून प्रत्येक बूथमधून तीनशे पदवी प्रमाणपत्रे देण्यात येतील.

प्रशासनातर्फे राज्यपाल, मुख्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री यांना निमंत्रण पत्रिका देण्याचे काम सुरू आहे. सोहळ्याच्या नियोजनासाठी बारा समित्या स्थापन केल्या असून मंडप व बूथ उभारणीचे काम सुरू आहे. ८१ बूथ प्रमाणपत्र वाटपासाठी असून ८२ वा बूथ विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी असेल. विद्यार्थ्यांना सोहळ्याची माहिती ई-मेल व एसएमएसद्वारे देण्यास सुरुवात झाली आहे.

यंदाही मुलांपेक्षा मुलींची प्रमाणपत्र स्वीकारण्यासाठीची संख्या अधिक आहे. ज्यांना प्रमाणपत्र कोणत्या बूथवर स्वीकारायचे माहीत नाही, त्यांच्यासाठी विद्यापीठाच्या वेबसाइटवर लिंक उपलब्ध केली आहे. या लिंकवर जाऊन त्यांनी पीआरएन नंबरसह अन्य माहिती भरल्यास त्यांना बूथचा क्रमांक उपलब्ध होईल. विशेष म्हणजे ग्रंथदिंडीसाठी विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा अधिकाधिक सहभाग असावा, यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. सोहळ्याची माहिती सर्व घटकांना होण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर केला जात असून सर्व पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्रांची छपाई पूर्ण झाली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2018
सकाळ

# वेब रेडिओसाठी मार्गदर्शक सूचना मागवण्यास मान्यता



कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत वेब रेडिओ सुरू करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यास मान्यता दिली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. शिवाजी विद्यापीठातर्फे वेब रेडिओ सुरू करण्यात येणार आहे. त्याबाबतच्या नियोजनावर व्यवस्थापन बैठकीत चर्चा झाली. वेब रेडिओ कार्यान्वित करताना व झाल्यानंतर त्यात कोणत्याही अडचणी येऊ नयेत, याबाबत चर्चा झाली. यासंबंधी मार्गदर्शक सूचना कोणाकडून घ्यायच्या ते निश्चित करण्यास बैठकीत मान्यता दिली. त्याचबरोबर सामाजिक वनीकरण, करवीर विभागाने विद्यापीठात वृक्ष लागवडीची इच्छा व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठानेही आपल्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले आहे. महाविद्यालयाच्या माध्यमातूनही विद्यापीठ वृक्ष लागवडीसाठी नेहमी अग्रेसर आहे. सामाजिक वनीकरणाने वृक्षलागवडीसाठी विद्यापीठाचे क्षेत्र मिळावे, अशी मागणी केली आहे. त्या मागणीवर बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. सामाजिक वनीकरणाने वृक्षलागवडीसाठी आवश्यक क्षेत्र देण्यास मंजुरी देण्यात आली. त्याचबरोबर ५४ व्या दीक्षांत समारंभात पदवी, पदविका, प्रमाणपत्रे, अभ्यासक्रमांची प्रमाणपत्रे प्रदान करण्यास बैठकीत मान्यता दिली. बैठकीस प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती. सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2018
पुढारी

# ग्रंथ महोत्सवासाठी विद्यापीठ सज्ज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथमहोत्सव १९ व २० मार्च या कालावधीत असणार आहे. या महोत्सवासाठी देश-विदेशांतील पन्नास प्रकाशकांचे स्टॉल्स असणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील उत्तमोत्तम ग्रंथसंपदा उपलब्ध होणार आहे. दरवर्षी ग्रंथमहोत्सव तीन दिवस असतो. यंदा मात्र दोन दिवस महोत्सव असणार आहे. विद्यापीठाच्या आवारात महोत्सव होईल. याबाबतची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
16 MAR 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विकासात असमानतेचा अडसर

म. टा. वृत्तसेवा, कोल्हापूर



राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना डॉ. आर. एस. देशपांडे. सोबत मान्यवर.

शिवाजी विद्यापीठच्या समाजशास्त्र अधिविभागाच्यावतीने नुकतेच दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र झाले. या सत्राचे उद्‌घाटन आयएसईसी, बेंगलोर या संस्थेचे प्रोफेसर डॉ. आर. एस. देशपांडे यांनी केले. या चर्चासत्रासाठी 'भारतातील दारिद्र्य आणि असमानतेचा प्रश्न' असा विषय होता.

या चर्चासत्राचे बीजभाषण डॉ. आर. एस. देशपांडे यांनी केले. देशपांडे म्हणाले, 'भारतातील दारिद्र्य आणि असमानता ही भारतातील असलेल्या आर्थिक स्त्रोतांची असमानता, जातव्यवस्था, सामाजिक, आर्थिक व राजकीय अधिकार आणि प्रादेशिक असंतुलित विकास यामुळे ही समस्या निर्माण झालेली आहे. त्याचबरोबर भारतातील ऐतिहासिक, सांस्कृतिक व राजकीय व्यवस्था देखील यास कारणीभूत ठरते. भारत सरकारने नियोजन आयोगाच्या माध्यमातून देशामध्ये आर्थिक वृध्दी, सेवाक्षेत्राचा विकास, औद्योगिक क्रांती, माहिती तंत्रज्ञान विकास आणि परकीय गंगाजळीमध्ये वृध्दी घडवून आणली. पण देशाचा सर्वसमावेशक विकास झाला नाही. त्यामुळे दारिद्र्याचे मोठे दुष्टचक्र

## डॉ. आर. एस. देशपांडे यांचे प्रतिपादन

निर्माण झाले. तोच प्रश्न देशाच्या विकासाच्या दृष्टीने मोठा अडथळा ठरत आहे. याचे कारण म्हणजे नियोजन आयोगाने केलेले चुकीचे विकासाचे प्रतिमान व प्रादेशिक असंतुलित विकास, हे दिसून येते. सन १९७३ मध्ये इंदिरा गांधी यांनी 'गरीबी हटाव' चा नारा दिला, तेंव्हापासून ते आजपर्यंत गरीबी म्हणजेच दारिद्र्य संपुष्टात आलेले नाही. उलट ते वाढतच चालले आहे. याचे दुष्परिणाम भारताला भविषयात तीव्रतेने भेडसावतील. म्हणूनच आपण देखील नेपाळ, बांगलादेश या देशांनी त्यांचा दारिद्र्याचा दर कमी करण्यासाठी जशी धोरणे राबविली त्या पध्द्तीने आपलाही दारिद्र्याचा दर कमी येवू शकतो. म्हणून नवीन धोरणातून व माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकासापासून अलिप्त असलेल्या सीमांत घटकापर्यंत गुंतवणूक करुन या संरचनात्मक दारिद्र्याला आणि असमानतेला पूर्णतः नष्ट करु शकतो.'

चर्चासत्राचे अध्यक्ष प्रा. डॉ. आर. बी. पाटील होते. प्रा. डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. चर्चासत्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने होते. डॉ. प्रतिमा पवार यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. आभार डॉ. प्रतिभा देसाई यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# 'पालकांच्या पाठबळानेच मुले उद्योजक बनतील'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'मुलांना उद्योजक बनविण्यासाठी पालक व शिक्षकांनी त्यांच्या मानसिकतेमध्ये बदल केला तरच मुले उद्योजक बनण्याचे स्वप्न उराशी बाळगतील,' असे मत स्वयंसिध्दाच्या संचालिका कांचन परुळेकर यांनी व्यक्त केले. कोल्हापूर इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कै. शिवाजीराव देसाइ स्मृती व्याख्यानमालेत त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. राजाराम गुरव होते.

परुळेकर म्हणाल्या की, विद्यार्थीदशेपासूनच मुलांना स्वावलंबनाचे धडे दिले तरच त्याला श्रमाची किंमत समजेल. अभ्यासाबरोबरच समाजाच्या गरजांचा अभ्यास त्याला उत्पादन क्षमता व निर्मिती कौशल्य विकसित करण्यास मदत करेल. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या डोक्यात नोकरीचे वेड डोक्यात न घालता शिक्षकांनी उद्योजक होण्याची प्रेरणा द्यावी. यावेळी त्यांनी घडविलेल्या अनेक महिला उद्योजकांची प्रेरणादायी उदाहरणे दिली.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. गुरव यांनी ज्ञान, कौशल्य, जिद्द, चिकाटी या गुणांची महती सांगत ज्ञानाचा उपयोग समाजासाठी कसा करावा हे सांगितले. केआयटीचे चेअरमन सचिन मेनन यांनी केआयटीचा इतिहास सांगत शिवाजीराव देसाई यांच्या स्मृतींना उजाळा दिला. संचालक डॉ. व्ही.व्ही.कार्जिन्नी यांनी स्वागत केले. प्रा. अमर टिकोळे यांनी नियोजन केले तर स्वरदा फडणीस हिने निवेदन केले. यावेळी शशी देसाइ व संस्था संचालक सदस्य सुनील कुलकर्णी, विविध उद्योजक, संस्थेचे हितचिंतक, संचालक, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# मुलाखत तंत्राविषयी विद्यापीठात मार्गदर्शन

कोल्हापूर : 'स्पर्धात्मक युगात मुलाखतीसाठी मुलाखत तंत्र आत्मसात करताना पूर्व तयारी, सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास यश निश्चित मिळेल,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राच्यावतीने राजर्षी शाहू सिनेट सभागृहात आयोजित मुलाखत तंत्र कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दूर शिक्षण केंद्राचे संचालक प्रा.डॉ. एम. ए. अनुसे होते.

प्रा. अनुसे म्हणाले की, मुलाखतीचे तीन टप्पे असतात. त्यामध्ये बायोडेटा, गट चर्चा, आणि मुलाखत तंत्र यांचा समावेश होतो. यांची योग्य सांगड घातल्यास मुलाखत यशस्वीरित्या देता येते. पहिल्या सत्रात उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी वैयक्तिक माहिती या विषयावर मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रामध्ये उपकुलसचिव एस. एम. कुबल यांनी मुलाखत तयारी या विषयावर मार्गदर्शन केले.

16 MAR 2018
पुढारी

# विद्यापीठात घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

येत्या गुढीपाडव्यापासून घनकचरा व्यवस्थापन कायदा-२०१६ सर्वत्र लागू होणार आहे. याच धर्तीवर शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागातर्फे विद्यार्थिनींच्या वसतिगृहामध्ये पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेमध्ये डॉ. निलिशा देसाई, डॉ. आसावरी जाधव, डॉ. पल्लवी भोसले यांनी विस्तृत माहिती दिली.

यावेळी पर्यावरणशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत आणि डॉ. प्रतिमा पवार आदींसह मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2018

पुण्यनगरी

# डॉ.प्रशांतकुमार कांबळे इंग्रजी अभ्यास मंडळावर

**रुकडी / प्रतिनिधी :**

येथील राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे सहायक प्राध्यापक डॉ.प्रशांतकुमार कांबळे यांचे शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अभ्यास मंडळावर कुलगुरू निर्देशित सदस्य म्हणून पाच वर्षांसाठी नामनिर्देश करण्यात आले आहे. डॉ.कांबळे हे २५ वर्षे प्राध्यापक म्हणून कार्यरत असून त्यांनी विद्यापीठाच्या युवा महोत्सव समितीवर सदस्यपदीही काम केले आहे. आजअखेर त्यांचे एक पुस्तक प्रकाशित असून ३ प्रकाशित पुस्तके त्यांनी संपादित केली आहे. 'आयरिश' साहित्यावर त्यांनी पीएचडी केली असून 'यूजीसी'चा मायनर प्रकल्प पूर्ण केलेला आहे. सध्या ते रोटरी सेटचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2018 सकाळ

# यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राला पुरोगामी चेहरा दिला

## प्रा. डॉ. अरुण भोसले : शहाजी महाविद्यालयात व्याख्यान

कोल्हापूर, ता. १५ : 'यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राला पुरोगामी चेहरा दिला,' असे मत शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. अरुण भोसले यांनी व्यक्त केले. शहाजी छत्रपती महाविद्यालयात श्रीपतराव बोंद्रे स्मृती व्याख्यानात ते 'यशवंतराव चव्हाण यांचे जीवन व कार्य' विषयावर बोलत होते. विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार व माजी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी होते. शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे मानद सचिव विजय बोंद्रे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. भोसले म्हणाले, ''यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा वारसा श्रीपतराव बोंद्रे यांनी आयुष्यभर चालविला. श्री. चव्हाण प्रतिशिवाजी होते. त्यांच्याकडे समाजवाद, साम्यवाद, नवमानवतावाद व गांधीवादही होता. त्यांनी सत्तेचा रथ गोरगरिबांच्या झोपडीकडे वळविला. राजकारण, समाजकारण, शिक्षण, सहकार, उद्योग क्षेत्राला नवी दिशा दिली. शिवाजी विद्यापीठाची स्थापना करून त्यांनी १९६१ मध्ये दीड कोटी रुपयांचा निधीही दिला. दोन वर्षांत कोयना धरणाची निर्मिती करून महाराष्ट्राच्या विकासाला नवसंजीवनी दिली. राष्ट्रीय पातळीवर संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, उपपंतप्रधान म्हणून त्यांनी भरीव काम केले.''

डॉ. मोरे यांनी श्री. चव्हाण यांनी विकासाचा मजबूत पाया रोवला. त्यावर आजचा महाराष्ट्र उभा आहे, असे सांगितले. या वेळी लाला गायकवाड, मदन बोडके, प्रा. एकनाथ काटकर, डॉ. एच. एस. वनमोरे, रवींद्र भोसले, मनीष भोसले उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष मानसिंग बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांचे संयोजनासाठी मार्गदर्शन लाभले. प्रा. डॉ. सुरेश शिखरे यांनी स्वागत केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले.